# ललित कला केंद्र (गुरुकुल)
# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## शैक्षणिक प्रवेश
## एम्.ए. भाग १ (नाटक)
## नमुना प्रश्नपत्रिका

वेळ :१ तास

गुण: ४०

संपूर्ण नाव : ..........................................................................................................................................

परीक्षा क्रमांक : ..........................................................................................................................................

*योग्य पर्याय निवडा. (सर्व प्रश्न अनिवार्य)*

**१. नाटकांमध्ये बोलण्याच्या संदर्भातील अभिनयाला ---- म्हणतात.** ( )

अ. आङ्गिक अभिनय. ब. आहार्य अभिनय. क. वाचिक अभिनय. ड. सात्विक अभिनय.

**२. *मिस्टर अँड मिसेस* या मराठी नाटकाचे दिग्दर्शक कोण ?** ( )

अ. चिन्मय मांडलेकर ब. अभिराम भडकमकर. क. असलम परवेझ. ड. प्रियदर्शन जाधव.

**३. सध्या कोणत्या देशात फूटबॉलच्या विश्वचषकासाठी सामने चाललेत ?** ( )

अ. अर्जेंटिना ब. स्पेन क. इटली ड. ब्राझील

**४. नाटकाचा दिग्दर्शक पुढील काम करतो ...** ( )

अ. नटांना वाक्ये कशी म्हणावीत आणि हालचाली कशा कराव्यात, हे सांगतो.

ब. नाटकासाठी रंगमंचावरील वस्तूंची मांडणी ठरवतो.

क. नटांकडून संवाद पाठ करून घेतो

ड. नाटकात अभिनय करतो.

**५. *आषाढातील एक दिवस* हे नाटक --- या नाटककाराशी संबंधित आहे.** ( )

अ. विशाखादत्त ब. कालिदास क. अश्वघोष ड. भवभूती

**६. भारताचे सांस्कृतिक खात्याचे नवे केंद्रिय मंत्री कोण ?** ( )

अ. स्मृती इराणी. ब. नितीन गडकरी. क. श्रीपद नाईक. ड. प्रकाश जावडेकर.

**७. एकांकिका म्हणजे ...** ( )

अ. एकाच व्यक्तिने वेगवेगळ्या भूमिका साकारलेले नाटक.

ब. पूर्ण नाटकाचा केवळ एकच अंक दाखवणारे नाटक.

क. लेखन, दिग्दर्शन आणि अभिनय एकाच व्यक्तिने केलेले नाटक.

ड. एकदा पडदा उघड्यावर नाटक संपल्यावरच पडदा पडतो, ते नाटक.

**८. छापा काटा या नाटकाचे नाटककार कोण ?** ( )

अ. इरावती कर्णिक. ब. मुक्ता बर्वे. क. रीमा लागू. ड. समीर विध्वंस.

**९. महाराष्ट्राचे सध्याचे राज्यपाल कोण ?** ( )

अ. पृथ्वीराज चव्हाण. ब. के. शंकरनारायण. क. अजितदादा पवार. ड. महम्मद फजल.

**१०. नाटकांत नटांच्या चेहऱ्यांना जी रंगरंगोटी करतात, त्याला ---- म्हणतात.** ( )

अ. वेशभूषा. ब. केशभूषा. क. रंगभूषा. ड. नेपथ्य.

**११. *हसवाफसवी* या पुनरुज्जीवित नाटकाचे दिग्दर्शक कोण ?** ( )

अ. दिलीप प्रभावळकर. ब. पुष्कर श्रोत्री. क. विक्रम गोखले. ड. चन्द्रकान्त कुलकर्णी.

**१२. राष्ट्रीय नाट्य विद्यालय, नवी दिल्लीचे विद्यमान संचालक कोण ?** ( )

अ. वामन केन्द्रे. ब. नसरुद्दीन शहा. क. अनुराधा कपूर. ड. सतीश आळेकर.

**१३. प्रपोजल या नाटकात ---- या अभिनेत्री अभिनय करतात.** ( )

अ. इला भाटे. ब. आदिती सारंगधर. क. मैथीली जुवेकर. ड. सई ताम्हणकर.

**१४. नाटकांत रंगमंचाच्या आजुबाजूला असलेल्या जागेला ----- म्हणतात.** ( )

अ. सायक्लोरामा. ब. फ्लायर्स. क. विंगा. ड. गँग-वे.

**१५. सध्या गाजत असलेला सिंचन घोटाळा कशाशी संबंधित आहे ?** ( )

अ. इमारती. ब. दूरसंचार यंत्रणा. क. गुरांचा चारा. ड. पाणी पुरवठा.

**१६. नाटककार नाटकाचा कोण असतो ?** ( )

अ. लेखक. ब. प्रमुख नट. क. निर्माता. ड. दिग्दर्शक.

**१७. पुढीलपैकी --- नाटकात प्रशांत दामले अभिनय करत असत ?** ( )

अ. लग्नबंबाळ. ब. एका लग्नाची गोष्ट. क. एका लग्नाची दुसरी गोष्ट. ड. लग्नकल्लोळ.

**१८. सध्या कोणता मराठी महिना सुरू आहे ?** ( )

अ. चैत्र. ब. वैशाख. क. आषाढ. ड. श्रावण.

**१९. नाटकाची रंगीत तालिम म्हणजे काय ?** ( )

अ. नाट्यसंहितेचे साभिनय वाचन. ब. उभे राहून केलेला नाट्यसराव.

क. नाटकाचे चित्रीकरण. ड. सर्व नाट्यघटकांसह केलेला सराव.

**२०. विवेक बेळे कोण आहेत ?** ( )

अ. नाटककार. ब. नेपथ्यकार. क. प्रकाश-योजक. ड. संगीत दिग्दर्शक.